# ASO - मुख्य परीक्षा - 2013
## पेपर 1
## मराठी व इंग्रजी

1. **'देवाने' या शब्दातील प्रत्यय कोणत्या विभक्तीचा आहे?**
(1) प्रथमा (2) द्वितीया (3) तृतीया (4) सप्तमी

2. **'क्ष' व 'ज्ञ' गटातील एक जोडी विसंगत आहे, ती कोणती ते पर्यायी उत्तरांतून शोधा.**

| 'क्ष' | 'ज्ञ' |
|---|---|
| (a) तत्पुरुष समास | (i) पहिले पद महत्त्वाचे |
| (b) द्विगू समास | (ii) दुसरे पद महत्त्वाचे |
| (c) बहुव्रीही समास | (iii) तिसऱ्याच पदाचा बोध होतो |
| (d) अव्ययीभाव समास | (iv) पहिले पद नकारार्थी |

**पर्यायी उत्तरे :**
(1) (a), (ii) (2) (c), (iii)
(3) (b), (iv) (4) (d), (i)

3. **'रस्त्याने जाताना सावधगिरीने जावे' या वाक्यात नामाचा कोणता प्रकार आला आहे? ते लिहा.**
(1) सामान्य नाम (2) विशेष नाम
(3) भाववाचक नाम (4) यापैकी नाही

4. **'मनस्+पटल' हा कोणत्या संधीयुक्त शब्दाचा विग्रह आहे?**
(1) मनःपटल (2) मनसपटल
(3) मनोपटल (4) मःनपटल

5. **'अत्तर', 'पेशवा', 'पोशाख' हे शब्द कोणत्या भाषेतील आहेत?**
(1) अरबी (2) फारसी
(3) पोर्तुगीज (4) कानडी

6. **'अत्यंत' या शब्दाचा संधीविग्रह –**
(1) अती+अंत (2) अत्याअंत
(3) अति–यंत (4) अति+अंत

7. **मराठीतील 'लिंग व्यवस्थेबद्दल' पुढीलप्रमाणे विचार मांडता येईल. जसे –**
(a) मराठीतील लिंग व्यवस्था ही अत्यंत अनियमित व धरसोडीची आहे.
(b) लिंग ओळखण्यासाठी नामाच्या रूपाचा विचार केला जातो.
(c) प्राणिमात्रांचे लिंग वास्तविक असे नसते.
(d) निर्जीव वस्तूंचे लिंग हे काल्पनिक नसते.
**वरील विधानांतून पर्यायी उत्तरांतून योग्य ते उत्तर सांगा –**
(1) फक्त (a) (2) फक्त (a), (c)
(3) फक्त (b), (d) (4) फक्त (a), (b)

8. **शब्दयोगी अव्ययासंबंधी काही विचार पुढीलप्रमाणे –**
(a) शब्दयोगी अव्यय हा विकारी शब्द आहे.
(b) शुद्ध शब्दयोगी अव्ययामुळे मागील शब्दांच्या अर्थास विशेष जोर येतो.
(c) शब्दयोगी अव्यये सामान्यतः नामांना जोडून येतात.
(d) 'च', 'मात्र', 'ना' ही स्थलवाचक आहेत.
**वरील विधानातून योग्य ते पर्यायी उत्तर शोधा.**
(1) फक्त (a) (2) फक्त (d)
(3) फक्त (c) आणि (d) (4) फक्त (b), (c)

9. **'जीवाची उलघाल होणे' या वाक्प्रचाराचा समानार्थी वाक्प्रचार कोणता?**
(1) जीवापाड जपणे (2) जीवाचे रान करणे
(3) ब्रह्मांड आठवणे (4) जीव मुठीत धरणे

10. **खालील विध्यर्थ वाक्य कोणते आहे? अचूक पर्याय ओळखा.**
(1) काल चांगला पाऊस पडला.
(2) काल चांगला पाऊस पडला काय?
(3) पावसा चांगला पड.
(4) पाऊस चांगला पडू दे.

11. **'देवा मला चांगली बुद्धि दे' या वाक्याचा प्रकार ओळखा.**
(1) स्वार्थी (2) विध्यर्थी
(3) आज्ञार्थी (4) संकेतार्थी

12. **'मी त्याला खूप समजावले परंतु त्याने ऐकले नाही' या संयुक्त वाक्यातील विधेय ओळखा.**
(1) मी, त्याने (2) समजावले, ऐकले
(3) मी, समजावले (4) त्याने, नाही

13. **'मी निबंध लिहीत असे' या वाक्यातील काळ ओळखा**
(1) अपूर्ण भूतकाळ (2) रीती वर्तमानकाळ
(3) रीती भूतकाळ (4) रीती भविष्यकाळ

14. **खालील वाक्यातील अधोरेखित शब्द कोणत्या विशेषणासारखा उपयोगात आणला आहे?**

The UNIQUE academy

**'त्याचा मित्र पुस्तक – विक्रेता आहे.'**

(1) धातुसाधित (2) अव्यय साधित
(3) नामसाधित (4) सार्वनामिक

**15. पर्यायी उत्तरांतील गटाबाहेरचा 'तद्धीत शब्द' कोणता?**

(1) आनंदित (2) नवीन
(3) वजनी (4) मानसिक

**16. 'सूर्य' या अर्थाने पुढील शब्द वापरत नाहीत.**

(1) भास्कर (2) सुधाकर
(3) सविता (4) रवी

**17. 'सामान्यरूपे' ही पुढीलप्रमाणे बदलतात. ती अशी,**

(a) अ – कारांत एकवचनी स्त्रीलिंगी नामाचे सामान्यरूप ए – कारांत होते.
(b) अ – कारांत पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप या – कारांत होते.
(c) ओ – कारांत स्त्रीलिंगी नामाचे सामान्यरूप एक वचनात होत नाही.
(d) ए – कारांत नपुसकलिंगी नामाचे सामान्यरूप आ – कारांत होते.

**पर्यायी उत्तरांतून योग्य उत्तर शोधा –**

(1) फक्त (c) (2) (a), (b)
(3) (c), (d) (4) (a), (c)

**18. 'कर' या धातुपासून 'मी करी' या एकवचनी पद्यरूपाचे अनेकवचनी रीतिभूतकाळात रूपांतर कसे होईल, बरोबर पर्याय निवडा –**

(1) आम्ही करु (2) मी करीन
(3) मी करुन (4) आम्ही करावे

**19. रामरावांना इतरांची स्तुती करण्याची सवय झालेली आहे. अधोरेखित शब्दासाठी योग्य वाक्प्रचार कोणता?**

(1) उजेड पाडणे (2) गुण उधळणे
(3) पांघरुण घालणे (4) चहा करणे

**20. 'कर्ता' या शब्दातील सिद्ध शब्द कोणता आहे?**

(1) कार्य करणारा (2) कर्तृत्व
(3) कर (4) कर्ता

**21. 'रमेशचंद्र पुस्तक वाचतो.' या वाक्याचे कर्तरी प्रयोगातून कर्मणी प्रयोगात असे रुपांतर होईल.**

(1) रमेशचंद्र पुस्तक वाच.
(2) पुस्तक रमेशचंद्र वाचतो.
(3) रमेशचंद्राने पुस्तक वाचले.
(4) रमेशचंद्र पुस्तक वाचत आहे.

**22. खालीलपैकी कोणत्या वाक्यात न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यय आहे, पुढीलपैकी बरोबर पर्याय निवडा –**

(1) मरावे परी कीर्तिरूपे उरावे
(2) तुला ज्ञान हवे की धन हवे
(3) एक रुपया म्हणजे शंभर रुपये
(4) प्रयत्न केला तर फायदाच होईल

**23. खालील पर्यायी उत्तरांतील पर्याप्तिवाचक–संख्यावाचक क्रियाविशेषणाचे पर्यायी उत्तर कोणत्या उदाहरणात आहे?**

(1) तो अभ्यास त्यास पुरेसा आहे.
(2) त्याने तो प्रसंग बहुधा पाहिला असावा.
(3) या कामासाठी मला काहीसा वेळ द्या.
(4) अत्यंत मेहनतीने त्याने ते काम संपविले.

**24. पुढे काही 'शब्दसिद्धी' चे प्रकार व उदाहरणे 'क्ष' व 'ज्ञ' गटात दिले आहेत. यातील योग्य पर्यायी उत्तर शोधा –**

| 'क्ष' | 'ज्ञ' |
|---|---|
| (a) तत्सम शब्द | (i) घर, पाय |
| (b) तद्‌भव शब्द | (ii) कलश, क्लेश |
| (c) देशी शब्द | (ii) तिकीट, नंबर |
| (d) विदेशी शब्द | (iv) खुळा, चिमणी |

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (ii) आणि (b), (i)
(2) (c), (i) आणि (d), (ii)
(3) (d), (ii) आणि (b), (iii)
(4) (c), (i) आणि (a), (iv)

**25. या व्यक्तीने भरपूर ऐकलेले व वाचलेले आहे. म्हणजेच ती ..... आहे.**

(1) बहुश्रुत (2) श्रोता
(3) पंडित (4) शहाणा

**26. 'त्याने अभ्यास केला' – प्रयोग ओळखा.**

(1) भावे प्रयोग (2) कर्तरी प्रयोग
(3) कर्मणी प्रयोग (4) संकीर्ण प्रयोग

**27. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे पृथक्करण कसे करता येईल?**

**'इंग्लंडच्या राजाचे सिंहासन कधीही रिकामे नसते.'**

(1) मूळ उद्देश्य (2) उद्देश्य विस्तारक
(3) विधेय विस्तारक (4) मूळ विधेय

**28. 'पांढरे स्वच्छ दात मुखास शोभा देतात'. या वाक्यातील उद्देश्य कोणते?**

(1) दात (2) पांढरे स्वच्छ
(3) मुखास शोभा (4) देतात

**29. खालीलपैकी संयुक्त स्वर कोणता?**

(1) आ (2) ओ
(3) ई (4) ड



The Unique academy

**30. खाली दिलेल्या शब्दांप्रमाणे योग्य पर्यायी उत्तर शोधा – 'क्रियापद वाक्य'**

(1) आशुतोषच्या डोळ्यांत पाणी आले.
(2) आशुतोषचे डोळे पाणीगत आहे.
(3) आशुतोषचे डोळे पाणीदार आहेत.
(4) आशुतोषचे डोळे पाणावले.

**31. 'पुनर्+जन्म' हा कोणत्या संधीयुक्त शब्दाचा विग्रह आहे?**

(1) पुर्नजन्म (2) पूर्णजन्म
(3) पुनर्जन्म (4) पुनर्जम्न

**32. मराठी 'उपसर्ग' लागून तयार न झालेला शब्द कोणता ते पर्यायी उत्तरांतून शोधा?**

(1) अबोल (2) बिनचूक
(3) पडछाया (4) अवघड

**33. खालील विधानातील अधोरेखित शब्दाचा चतुर्थी विभक्तीचा कारकार्थ कोणता?**
**'लाठीच्या एकेका तडाक्यास त्याने एकेक इसम लोळविला.'**

(1) कर्ता (2) कर्म (3) करण (4) अपादान

**34. 'मला माहीत असतानाही छातीचा व्यापार करुन मी जशासतसे उत्तर समोरच्याला दिले' या वाक्यातील वाक्प्रचार व त्याचा अर्थ काय?**
**खालीलपैकी बरोबर पर्याय निवडा.**

(1) छातीचा व्यापार – जसे पाहिजे तसे.
(2) छातीचा व्यापार – धोक्याचा व्यवहार
(3) छातीचा व्यापार – बिनधास्त केलेला व्यवहार
(4) छातीचा व्यापार – रोखठोक केलेला व्यवहार

**35. पर्यायी उत्तरांतील शुद्ध जोडशब्द कोणता?**

(1) उधारउसनवार (2) ऊधारऊसनवार
(3) ऊधारउसनवार (4) उदारउसणवार

**36. खालील वाक्यातील 'विधेय पूरक' कोणते?**
**'यशोदाने श्रीकृष्णाला लोणी दिले.'**

(1) यशोदाने (2) श्रीकृष्णाला
(3) लोणी (4) दिले

**37. 'आत्यंतिक अभाव' या अर्थाचा वाक्प्रचार खालीलपैकी कोणता आहे?**

(1) कपिलाषष्ठीचा योग येणे
(2) लंकेची पार्वती असणे
(3) साखर औषधाला देखील नसणे
(4) हतबल होणे

**38. 'क्ष' आणि 'ज्ञ' गटातील अनुक्रमे क्रियापदाचा काळ आणि क्रियापदाची आख्याते दिली असून पर्यायी उत्तरांतील एक उत्तर योग्य असून त्या उत्तरांतील चारही जोड्या योग्यरीत्या जुळविल्या आहेत, असे ते पर्यायी उत्तर कोणते?**

| | 'क्ष' (काळ) | | 'ज्ञ' (आख्यात) |
|---|---|---|---|
| (a) | भविष्यकाळ | (i) | द्वितीय आख्यात |
| (b) | विध्यर्थ्य | (ii) | ऊ–आख्यात |
| (c) | संकेतार्थ | (iii) | ईलाख्यात |
| (d) | आज्ञार्थ | (iv) | वाख्यात |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iv) | (ii) | (iii) |
| (2) | (i) | (iii) | (ii) | (iv) |
| (3) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (4) | (ii) | (i) | (iii) | (iv) |

**39. 'त्याचा अर्ज फेटाळण्यात आला.' हे होकारार्थी वाक्य विरुद्धार्थी शब्द वापरुन नकारार्थी असे होईल. खालीलपैकी अचूक पर्याय निवडा –**

(1) त्याचा अर्ज घेतला गेला नाही.
(2) त्याचा अर्ज स्वीकारण्यात आला नाही.
(3) त्याचा अर्ज जमा करुन घेतला नाही.
(4) त्याचा अर्ज दाखल केला नाही.

**40. प्रयोग विचाराच्या दृष्टिकोनातून खालीलपैकी कोणते एक वाक्य गटाबाहेरचे आहे?**

(1) मला आज मळमळते.
(2) आज सारखे गडगडते.
(3) सहलीस जाताना गावाजवळ उजाडले.
(4) गाय गुराख्याकडून बांधली जाते.

**41. उभयान्वयी अव्ययाचा प्रकार ओळखा – 'विजा चमकू लागल्या आणि पावसाला सुरुवात झाली.'**

(1) विकल्पबोधक (2) समुच्चयबोधक
(3) न्यूनत्वबोधक (4) परिणामबोधक

**42. कोठेही गेले तरी मनुष्यस्वभाव सारखाच या अर्थाची म्हण**

(1) पाचा मुखी परमेश्वर
(2) मुलाचे पाय पाळण्यात दिसतात
(3) पळसाला पाने तीनच
(4) उथळ पाण्याला खळखळाट फार

**43. जा, ये, उठ, बस, खा, पी वगैरे धातूंपासून जी क्रियापदे तयार होतात, त्यांना ....... म्हणतात.**

(1) सिद्ध क्रियापद (2) साधित क्रियापद
(3) संयुक्त क्रियापद (4) द्विकर्मक क्रियापद

**44. 'बिन भाड्याचे घर' कशास म्हटले जाते?**

(1) शाळा (2) स्वत:चे घर
(3) तुरुंग (4) सरकारी निवासस्थान

**45. 'श्', 'ष्', 'स्' यांना ...... म्हणतात.**
(1) अर्धस्वर (2) महाप्राण
(3) उष्मवर्ण (4) स्वतंत्रवर्ण

**46. 'उभयान्वयी अव्ययाचा' विचार करताना पुढील बाबींचा विचार करावा लागेल –**
(a) दोन किंवा अधिक वाक्ये जोडणाऱ्या विकारी शब्दांना उभयान्वयी अव्यय म्हणतात.
(b) प्रधानसूचक व गौणत्वसूचक असे दोन मुख्य प्रकार उभयान्वयी अव्ययात आहेत.
(c) 'अन्', 'आणखी', 'आणि' ही समुच्चयबोधक उभयान्वयी अव्ययाची उदाहरणे आहेत.
(d) 'विजयने उत्तम अभ्यास केला म्हणून त्याला यश मिळाले.
**या वाक्यात न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यय आहे –**
(1) (a) फक्त (2) (a), (b), (c)
(3) (b), (c) (4) (b), (c), (d)

**47. खालील पर्यायी उत्तरांतून 'पररूप संधी' ओळखा –**
(1) सदाचार (2) जगदीश
(3) करून (4) काहीसा

**48. खालील वाक्यातील अधोरेखित शब्द काय दर्शवितात?**
**'आज त्याजपाशी संपत्ती आहे.'**
(1) उद्देश्य विस्तार (2) विधेय विस्तार
(3) उद्देश्य (4) विधेय

**49. खालील पर्यायी उत्तरांतील विसंगत शब्द कोणता?**
(1) विंजणा (2) विंजन
(3) विंचडा (4) विंझणा

**50. खालील वाक्य हे कोणत्या स्थानिक क्रियाविशेषणाचे' उदाहरण आहे?**
**'ती काय माती गाते!'**
(1) विशेषण (2) नाम
(3) कृदंत (4) उभयान्वयी अव्यय

**51. विरामचिन्हांचा वापर करताना 'संयोगचिन्हांचा वापर करण्यात येतो तो असा –**
**(A) विधाने –**
(a) !' या चिन्हाचा वापर करतात
(b) संबोधन दर्शविताना
(c) दोन शब्द जोडताना
(d) ओळीच्या शेवटी शब्द अपुरा राहिल्यास
**(B) वरील विधानातील योग्य उत्तर पर्यायी उत्तरांत शोधा–**
(1) फक्त (b) (2) (b) आणि (c) फक्त
(3) (c) आणि (d) फक्त (4) (a), (c) आणि (d)

**52. मराठी 'प्रयोग व्यवस्थेत' कर्मणी प्रयोगाविषयी पुढील काही मते मांडली आहेत, ती अशी –**
(a) कर्ता प्रथमांत असतो.
(b) कर्माप्रमाणे क्रियापद असते.
(c) कर्म प्रथमांत असते.
(d) 'नवीन कर्मणी प्रयोगात' कर्त्याला 'कडून' हा शब्दयोगी अव्यय लावत नाहीत.
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (a), (b) (2) फक्त (b), (c)
(3) फक्त (a), (d) (4) फक्त (a),(c), (d)

**53. खालील चारी जोड्या योग्य रीतीने जुळवून त्यातील विसंगत जोडी कोणती ते सांगा?**

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| (a) तर्क | (i) युक्ती |
| (b) विचार | (ii) कल |
| (c) वळण | (iii) अभ्यास |
| (d) शंका | (iv) तरंग |

**पर्यायी उत्तरे :**
(1) (a), (iii) (2) (b), (i)
(3) (c), (ii) (4) (d), (iv)

**54. खालीलपैकी कोणत्या वाक्यात आत्मवाचक सर्वनाम आले आहे?**
(a) मी आपणहून सहलीला जाण्याची तयारी दाखवली
(b) आम्ही उद्या सहलीला जाऊ.
(c) जनतेला जागृत करणे हे त्यांचे कर्तव्य आहे.
(d) तुम्ही आता सर्वजण घरी जा.
**पर्यायी उत्तरे :**
(1) (c) (2) (b) (3) (d) (4) (a)

**55. खालील विधानांतील योग्य उत्तर शोधा –**
**'आपले भाषाशिक्षण विविध कौशल्यावर सुरू असते' –**
(a) ऐकणे (b) बोलणे (c) वाचणे (d) फिरणे
**पर्यायी उत्तरे :**
(1) (a), (b), (d) (2) (d)
(3) (b), (c), (d) (4) (a), (b), (c)

**खालील उतारा वाचून प्र.क्र. 56 ते 60 या प्रश्नांची योग्य ती पर्यायी उत्तरे लिहा.**

जगातील नामवंत साहित्यिकांनी साहित्याचं हे विश्व किती संपन्न केलं आहे! ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी लिहिली व तिच्यामधून जीवनाविषयीचं गहन चिंतन प्रकट केलं. नामदेव–तुकोबांनी अभंग लिहिले व त्यांतून प्रपंच करता करता परमार्थ कसा साधावा, याची पायवाट दाखविली! एकनाथांनी भागवतामधून नवविधा भक्तीचे

पाट वाहविले. रामदासांनी दासबोधातून 'यत्न तो देव' का जाणावा, याचं मार्मिक विवरण केलं. श्रीचक्रधरस्वामींच्या 'लीळा चरित्रा'तून आध्यात्मिक व सामाजिक समतेचा संदेश प्रकटला. ही तर झाली संतवाणी. वेगवेगळ्या धर्माच्या पवित्र ग्रंथांचं वाचन केलं तर त्यातून काय आढळतं? वेद-उपनिषदं, कुराण, धम्मपद, बायबल, गुरुग्रंथसाहेब या सर्वच धर्मग्रंथात उदात्त जीवनादर्शाचं विवरण केलं आहे. त्याचं आचरण केल्यास आपल्या जीवनशैलीत केवढं परिवर्तन घडतं. जीवनाकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोणही बदलतो. पावित्र्य, मांगल्य, शुचित्व या मूल्यांची महानता आपल्याला जाणवते. दया, क्षमा, करुणा, प्रेम, परस्पर सामंजस्य, बंधुत्व, एकात्मता या मूल्यांची महती या धर्मग्रंथांच्या वाचनानं कळते. ऐहिक जीवन चांगल्या प्रकारे कसं जगावं व आध्यात्मिक वाटचाल कशी करावी, याचं मार्गदर्शन लाभतं. धर्मग्रंथांचे हे नंदादीप नसते तर आपण ही वाटचाल कशाच्या आधारे केली असती?

ग्रंथांमध्ये ज्ञानाच्या अनेकविध शाखा जशा प्रकाशमान होतात त्याचप्रमाणं विज्ञानाच्याही अनेकविध शाखांचं दर्शन घडतं. तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, शिक्षणशास्त्र, पुरातत्त्व संस्कृती या विषयांची कितीतरी दालनं ग्रंथांनीच आपल्यासाठी उघडलीत ना? वैज्ञानिकांनी अहोरात्र परिश्रम केले व त्यांतून त्यांना अनेक शोध लागले. या शोधांचं विवरण त्यांनी आपल्या ग्रंथांतूनच नाही का केलं? या शोधांमुळं मानवाच्या बुद्धीनं अवकाशापर्यंत व ग्रहगोलांपर्यंत कशी झेप घेतली, ते त्यांच्या ग्रंथांमुळं आपल्याला कळतं. हे ग्रंथ आपण वाचले नाहीत व या शोधांची माहिती घेतली नाही तर जग कुणीकडे चाललं आहे, याची आपल्याला कशी कल्पना येणार? ललित वाङ्मयाच्या वाचनानं आपलं मनोरंजन होतं; त्याचप्रमाणं वेगवेगळ्या लेखकांच्या भावविश्वाचं दर्शन घडतं. प्रवासवर्णनपर ग्रंथ आपल्याला वेगवेगळ्या प्रदेशांत घेऊन जातात. तिथले जगावेगळे अनुभव, तिथली माणसं, तिथला निसर्ग, तिथल्या रीतिभाती, तिथल्या जीवनशैली यांचा व आपला परिचय होतो. लेखकांना या प्रदेशात आलेले अनुभव आपलंही मन मोहून टाकतात.

'गावाकडच्या गोष्टी' व 'माणदेशी माणसं' यांच्यासारख्या व्यंकटेश माडगूळकरांच्या पुस्तकांतून ग्रामीण जीवन किती हुबेहूब साकार होतं! शंकर पाटील यांच्या 'आभाळ', 'भेटीगाठी', 'वळीव' यांसारख्या ग्रामीण कथासंग्रहातून ग्रामीण जीवनाच्या व्यथावेदना जशा प्रकटतात त्याचप्रमाणं त्यांच्या 'धिंड' सारख्या कथा खदखदून हसायला लावतात. त्यांच्या ग्रामीण संवादांची कोल्हापुरी फेक कशी न्यारी आहे, हे त्यांच्या 'कथा अकलेच्या कांद्याची' आणि 'लवंगी मिरची कोल्हापूरची' यांसारख्या वगनाट्यांमुळं जाणवतं.

**56. धर्मग्रंथांच्या वाचनाने जीवनदर्शनाचे विवरण कळते, ते असे –**

(a) प्रेम (b) परस्पर सामंजस्य
(c) जगाविषयी घृणा (d) एकात्मता
(e) हिंसाव्रत (f) संकुचित जीवनदृष्टिकोण

**वरील विवरणातील पर्यायी उत्तरांतील योग्य उत्तर कोणते?**

(1) (a), (b), (d) (2) (a), (b), (c), (d)
(3) (d), (e), (f) (4) (a), (b), (d), (f)

**57. खालील काही विधाने पहा –**

(a) शंकर पाटलांच्या 'धिंड' सारख्या कथा म्हणजे करुणरसाचे डोहच होत.
(b) 'गावाकडच्या गोष्टी' तून ग्रामीण जीवन कळते.
(c) 'वळीव' या कथेतून शंकर पाटलांनी पुरते हसवून हसवून सोडले आहे.
(d) ग्रामीण संवादाची कोल्हापुरी फेक ना. स. इनामदारांच्यात आहे.

**पर्यायी उत्तरांतून योग्य उत्तर शोधा –**

(1) (a) (2) (b)
(3) (c) (4) (d)

**58. वैज्ञानिकांच्या परिश्रमामुळे पुढील गोष्टी समजून आल्या, त्या अशा –**

(a) पुरातत्त्व संस्कृती (b) धर्मकारण
(c) राज्यशास्त्र (d) अवकाश झेप
(e) मानसशास्त्र (f) ग्रहगोल शास्त्र

**वरील विधानांच्या पर्यायी उत्तरांतून योग्य उत्तर सांगा –**

(1) (d), (e) (2) (a), (b), (c)
(3) (d), (f) (4) (a), (b), (c), (e)

**59. ललित वाङ्मयाच्या वाचनाने पुढील बाबींची कल्पना येते, त्या पुढीलप्रमाणे –**

(a) वेगवेगळ्या औषधांची शास्त्रोक्त पद्धतीने माहिती मिळते.
(b) आपलं मनोरंजन होतं.
(c) वेगवेगळ्या लेखकांचं भावविश्र्वाचं दर्शन घडते.
(d) मन भांबावून जाते.

**वरील विधानातून योग्य ते उत्तर पर्यायी उत्तरांतून शोधा –**

(1) (a), (b) (2) (c), (d)
(3) (a), (d) (4) (b), (c)

**60. पुढील विधाने वाचून त्या खाली दिलेल्या पर्यायी उत्तरांतून योग्य उत्तर शोधा –**

**विधाने –**

(a) साहित्यिकांनी साहित्याचे विश्व किती विचित्र करुन टाकले आहे.
(b) ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी' तून जीवनविषयक चिंतन प्रकट केले आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) चूक (2) (b) बरोबर
(3) (a), (b) बरोबर (4) (a), (b) चूक

The UNIQUE academy

**61. Choose the antonym for the word underlined in the sentence given : Absolute powers cannot be vested in an individual.**

(1) Perfect (2) Unqualified
(3) Partial (4) Arbitrary

**62. Recognize the parts of speech of the underlined words :**
**Youth is the time when the seeds of character are sown.**

(1) Noun (2) Adverb clause
(3) Adjective clause (4) Noun clause

**63. Choose a suitable replacement for the underlined phrase.**
**He found the gold coins as he cleans the floor.**

(1) as he had cleaned
(2) while he cleans
(3) while he is cleaning
(4) while cleaning

**64. He is sorrowful, but still hopeful.**
**Identify the type of the sentence.**

(1) Simple sentence
(2) Complex sentence
(3) Compound sentence
(4) Complex - Compound sentence

**65. Make one sentence of the two :**

(a) Ann took some photographs
(b) Have you seen them

**Answer Options :**

(1) Have you seen the photographs Ann took?
(2) Ann took some photographs and have you seen them.
(3) Have you seen the photographs that Ann took?
(4) Have you seen the photographs which Ann took?

**66. It is a very spacious ....... for constructing a nursing home.**
**Pick out the correct word to complete the sentence.**

(1) cite (2) site (3) sight (4) seat

**67. Very few things - are as useful as wood.**
**Select the alternative which can be the correct comparative degree of the above sentence.**

(1) Wood is more useful than any other things.
(2) Wood is more useful than many other things.
(3) Wood is more useful than most other things.
(4) No other thing is as useful as wood.

**68. Change into Indirect Speech :**
**She said to him, "What is it that makes you so much stronger and braver than any other man ?"**

(1) She asked him what was it that made him so much stronger and braver than any other man.
(2) She asked him that what was it that made him so braver and stronger than any other man.
(3) She said him that what was that, that made him so braver and stronger than any other man.
(4) She stated him that what was that, that made him so braver and stronger than any other man.

**69. Complete the following sentence :**
**Sanatorium is ......**

(1) a place for the sick to recover health
(2) a place for old people
(3) a home for orphans
(4) a home for lunatics

**70. Choose the correct meaning of the word underlined.**
**He is noted for his benevolent nature.**

(1) generous (2) flexible
(3) pleasing (4) brave

**71. Correct the spelling of underlined word :**
**No physique can cure**

(a) physique (b) physic
(c) physics (d) features

**Answer Options :**

(1) (a) is correct
(2) (a) and (b) are correct
(3) (c) is correct
(4) (d) is correct

**72. Choose the correct alternative :**
**I [am to leave, would leave, was to leave, was to have left] on Thursday. But on Thursday I had a terrible cold. So decided to wait till Saturday.**

(1) am to leave (2) would leave
(3) was to leave (4) was to have left

**73. Identify the group of words spelt correctly :**

(1) digression, equilibrium, dilemma, equivalent.
(2) digression, equilibrium, dilemma, equivalent.
(3) digression, equilibrium, dilemma, equivalent.
(4) digression, equilibrium, dilemma, equivalent.

**74. Change into reported speech :**
**The mother said, "Run away children, do not disturb me".**

(1) The mother ordered the children to run away and forbade them to disturb her.
(2) The mother said to children to run away and not to disturb her.
(3) The mother asked children to run away and not to disturb her.
(4) The mother told children not to disturb her and run away.

**75. If the usage of a suffix makes the word 'teach' into 'teacher', then which will be the correct suffix to use for the word 'betray'?**

(1) betrayfy (2) betrayfic
(3) betrayal (4) betrayen

**76. Which part of speech the word 'above' belongs to in the given sentence?**
**The moral law is above the civil.**

(1) Noun (2) Adjective
(3) Preposition (4) Adverb

**77. He deals ..... the correct alternative to complete the sentence.**

(1) in (2) out (3) with (4) by

**78. Choose the correct meaning of the idiom underlined in the sentence given :**

**He got the doors <u>slammed in his face.</u>**

(1) hitting his face (2) banged up
(3) stuck tight (4) closed shut in anger

**79. I need interpreters in my surgery who.....speak Punjabi, Urdu and Guiarathi. Pick out the correct alternative to make the sentence meaningful.**

(1) may (2) should (3) must (4) can

**80. Virdhawal Khade practices in such a way <u>that he will win Gold Medal.</u> Identify the type of the clause underlined.**

(1) Noun clause
(2) Adjective clause
(3) Adverb clause of purpose
(4) Adverb clause of result

**81. The best sources of electricity, ....., include water, wind and solar power Pick out the correct alternative to complete the sentence.**

(1) but (2) however
(3) Yet (4) though

**82. My friend decided to ..... in marketing as he wants to be a marketing manager. (Special)**

**Add the correct suffix to the given word to make the sentence meaningful.**

(1) .... ize (2) .... ist
(3) .... ization (4) .... ized

**83. You thought it was still six ....... ?**

**Pick out the correct alternative to complete the sentence.**

(1) did you (2) didn't you
(3) was it (4) wasn't you

**84. You must <u>take heart</u> and face life boldly.**

**Pick out the correct meaning of the underlined phrase.**

(1) Feel bold (2) Feel excessively
(3) Feel glad (4) Feel superior

**85. Pick out the correct word to fill in the blank :**
**I did not know it until you**.....

(1) speaking (2) were spoken
(3) speak (4) spoke

**86. (a) Gavaskar was the star of Indian cricket.**
**(b) An elephant is a wise animal.**
**Pick out the correct sentences.**

(1) Only (a) is correct
(2) Only (b) is correct
(3) Both (a) and (b) are correct
(4) Both (a) and (b) are incorrect

**87. (a) The tallest of the players was injured.**
**(b) Ram as well as Shyam was present.**
**Identify the correct sentences.**
**Answer Options :**

(1) Only (a) is correct
(2) Only (b) is correct
(3) Both (a) and (b) are correct
(4) Both (a) and (b) are incorrect

**88. Choose the correct alternative :**
**......so many books ?**
**How are you going to read them?**

(1) Need you to buy
(2) Need you buy
(3 Must you need buy
(4) Need you have to buy

**89. The <u>causal</u> relation between nutritious diet and good health is well known. Pick out the correct meaning of the word underlined :**

(1) occasional (2) irregular
(3) useful (4) denoting cause

**90. Read the answer options and recognise the type of sentence given : Let him be taken away.**

(1) Active - Imperative
(2) Active - Exclamatory
(3) Passive - Statement
(4) Passive - Imperative

**91. Choose the correct options for the conversion of the following sentence into complex. Let me alone, and I shall do the work much better.**

(a) If you let me alone, I shall do the work much better.
(b) When I am alone, I shall do the work much better.
(c) If I am alone, I shall do the work much better.
(d) I shall do the work much better ; Let me alone.

**Answer Options :**

The UNIQUE academy

(1) (a) only (2) (b) only
(3) (a) and (b) only (4) (c) and (d) only

**92. Give the meaning of underlined words.**
**It won't be long before you have the world, literally at your finger tips and the ability to communicate at work or play.**
(1) near your finger tips
(2) to have everything, easily accessible
(3) to do anything
(4) advance in a particular situation

**93. Meena is not highly educated but she has the gift of the gab.**
**Choose the correct meaning of the underlined part.**
(1) flattering words (2) good personality
(3) a blent of acting (4) art of speaking

**94. In the sentence given, state which is the exact meaning of the word 'Race'? The race of ginseng is difficult to find.**
(1) Nationality (2) Contest
(3) Root (4) Track

**95. Find out the clause used in the sentence :**
**An author who was famous during the freedom struggle lived in that cottage which overlooks the lake.**
(1) Noun clause (2) Adverb clause
(3) Adjectival clause (4) None of these

**Read the following passage carefully and answer the questions given below it.**

"People very often complain that poverty is a great evil and that it is not possible to be happy unless one has a lot of money. Actually, this is not necessarily true. Even a poor man, living in a small hut with none of the comforts and luxuries of life, may be quite contented with his lot and achieve a measure of happiness. On the other hand, a very rich man, living in a palace, and enjoying everything that money can buy, may still be miserable, if, for example, he does not enjoy good health, or his only son has taken to evil ways. Apart from this, he may have a lot of business worries which keep him on tenterhooks most of the time. There is a limit to what money can buy and there are many things which are necessary for a man's happiness and which money cannot procure.

Real happiness is a matter of the right attitude, and the capacity of being contented with whatever you have is the most important ingredient of this attitude".

**96. May still be miserable.**
**The underlined phrase means.**
(1) Poor (2) dejected
(3) ill-tempered (4) disagreeable

**97. It is true that......**
**Complete the sentence choosing the correct alternative.**
(1) money alone cannot give happiness.
(2) money alone can give happiness.
(3) money always give happiness.
(4) money seldom gives happiness.

**98. The most appropriate title to the passage is.....**
(1) The key of happiness
(2) Poverty, a curse of life
(3) Money and contentment
(4) Contentment, a key to happiness

**99. The phrase "on tenterhooks" means :**
(1) in a state of forgetfulness
(2) in a state of thoughtfulness
(3) in a state of anxiety
(4) in a state of sadness

**100. Identify the true statement from the following :**
(1) Only the rich man can be happy.
(2) A poor but contented man is always happy.
(3) A poor and contented man can never be happy
(4) A poor but contented man can be happy.

the UNIQUE academy

# ASO - मुख्य परीक्षा 2013 उत्तरे
# मराठी-इंग्रजी

| Ans | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 3 | # | 1 | 2 | 4 | 4 | 4 | 3 | 4 |
| 11 | 3 | 2 | 3 | 3 | 3 | 2 | 4 | 1 | 4 | 3 |
| 21 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 3 | 2 | 1 | 2 | 4 |
| 31 | 3 | 2 | 3 | 2 | 1 | 2 | 3 | 3 | 2 | 4 |
| 41 | 2 | 3 | 1 | 3 | 3 | 3 | 3 | 2 | 3 | 2 |
| 51 | 3 | 2 | 3 | 4 | 4 | 1 | 2 | 3 | 4 | 2 |
| 61 | 3 | 3 | 4 | 3 | 1 | 2 | 3 | 1 | 1 | 1 |
| 71 | 2 | 4 | 2 | 1 | 3 | 3 | 1 | 4 | 4 | 4 |
| 81 | 2 | 1 | 2 | 1 | 4 | 2 | 3 | 2 | 4 | 4 |
| 91 | 1 | 2 | 4 | 3 | 3 | 2 | 1 | 4 | 3 | 2 |

# या चिन्हाने दर्शविलेले प्रश्न रद्द करण्यात आलेले आहेत.